# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक २०५/२०१६

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन अद्ययावत करणेबाबत (Ph. D. Tracking System 2016).**

विद्यापीठ विभाग व संशोधन केंद्र येथे पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी **Ph. D. Tracking System** सुरू करण्यात येणार असून याकरिता सदर अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन प्रक्रियेत अद्ययावत असणे आवश्यक आहे.

यासंदर्भात सर्व संबधिताना कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी संबधित विद्यापीठ विभाग/संशोधन केंद्रामार्फत विद्यापीठाच्या **bcud.unipune.ac.in** या संकेतस्थळावरून **दि. ३१/१२/२०१६** पर्यंत आपली माहिती अद्ययावत करून शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

<u>विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रक्रिया :—</u>

- Sign-up for Ph. D. Tracking या link वर Click करावे.
- या लिंकव्दारे प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला योग्य ई—मेल आयडी व मोबाईल नंबर वापरून अकाउंट तयार करावे.
- अकाउंट तयार झाल्यानंतर login link ला Click करून आपली माहिती अद्ययावत करावी.
- सर्व माहिती अद्ययावत केल्यानंतर त्याची प्रिंट काढुन आपल्या संशोधन केंद्रात जमा करावी.
- सदर अकाउंट विद्यार्थ्याने त्याच्या पुढील सर्व प्रक्रियेसाठी वापरावयाचे आहे. त्यामुळे आपला User Name व Password जतन करून ठेवावा.

<u>संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभागासाठी ऑनलाईन प्रक्रिया :—</u>

- संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभाग यांनी आपल्या BCUD Online Login व्दारे Login करावे.
- Login झाल्यानंतर Ph. D. Tracking System या डाव्या बाजुला दिलेल्या मेनू मधुन link Open करावी.
- आपल्या संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभाग अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माहिती भरलेली असेल अशा विद्यार्थ्यांची माहिती Confirm Button करून स्वीकारावी.
- विद्यार्थ्यांचे नाव Confirm केल्यानंतर आपणास विद्यार्थ्यांची माहिती बघता येईल व त्यात काही दुरूस्ती करावयाची असेल तर दुरूस्ती करता येईल.
- सर्व विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत करून त्याची यादी शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.
- यादी सोबत सर्व विद्यार्थ्यांचे स्वाक्षरीत फॉर्म जमा करावेत.

इतर सुचना :—

- प्रत्येक विद्यार्थ्यास अकाउंट तयार करताना PUNCODE टाकणे आवश्यक आहे. PUNCODE म्हणजे विद्यापीठ विभाग/संशोधन केंद्र /संस्था यांचा BCUD Online चा User Name.
- संशोधन मार्गदर्शकाचे (Research Guide) BCUD Online त्या त्या विद्यापीठ विभाग/संशोधन केंद्र/संस्था या अंतर्गत Teacher Profile मध्ये नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे PG Recognition/Research Guide Details अंतर्गत माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :—

- मोबाईल क्रमांक :— 7447563041
- ई—मेल आयडी :— phdtracking_support@pun.unipune.ac.in

विद्यार्थ्यांनी संशोधन केंद्रामार्फत Ph. D. Tracking System मध्ये नोंदणी करणे बंधनकारक असुन नोंदणी नसलेल्या विद्यार्थ्यांची पीएच.डी. अभ्यासक्रमासंदर्भातील पुढील कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५/१२/२०१६.
उपकुलसचिव,
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/४६७८
दिनांक : ०५/१२/२०१६

प्रत :—

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रात पीएच. डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.